## 32. आणिबाणी
## भाग -XVIII कलम 352 ते 360

- स्विकार - 1935 चा भारतीय प्रशासकीय कायदा
- आणिबाणीचे प्रकार -
  1. राष्ट्रीय आणिबाणी
  2. घटनात्मक आणिबाणी
  3. आर्थिक आणिबाणी
- **आणिबाणी विषयक कलमे व तरतूदी -**
- कलम 352 - राष्ट्रीय आणिबाणीची घोषणा
- कलम 353 - आणिबाणीच्या घोषणेचे परिणाम
- कलम 354 - आणिबाणीच्या काळात महसुलाच्या विभागणीच्या तरतूदी लागू करण्याविषयी
- कलम 355 - परकिय आक्रमण आणि अतंर्गत अशांतता यापासून राज्याचे रक्षण करण्याचे केंद्राचे कर्तव्य असेल.
- कलम 356 - राज्यामध्ये घटनात्मक यंत्रणा कोडमडले असताना राष्ट्रपती राजवट लागू करण्याच्या तरतूदी
- कलम 357 - कलम 356 अंतर्गत आणिबाणीची घोषणा केली असताना न्यायीक अधिकाराच्या वापराविषयीची तरतूद
- कलम 358 - आणिबाणीच्या काळात कलम 19 मधील तरतूदी निलंबित करणे बाबत
- कलम 359 - आणिबाणीच्या काळात मूलभूत हक्काची अंमलबजावणी निलंबित करणे बाबत.
- कलम 359 (A) - हा भाग पंजाब राज्याला लागू करणे बाबत (निरसित)
- कलम 360 - आर्थिक आणिबाणीची तरतूद

**राष्ट्रीय आणिबाणी -**

- युद्ध, परकिय आक्रमण, सशस्त्र उठाव यामुळे भारताच्या एखाद्या भागाची सुरक्षा धोक्यात आल्याची राष्ट्रपतीला खात्री झाल्यास राष्ट्रीय आणिबाणीची उद्घोषणा कॅबिनेट मंत्रीमंडळाचे सल्ल्याने जाहीर केली जाते. (राष्ट्रपती पंतप्रधानाच्या सल्ल्याने आणिबाणीची घोषणा करू शकत नाही. - 1978 च्या 44 व्या घटना दुरूस्तीनुसार)
- राष्ट्रपतींनी राष्ट्रीय आणिबाणी जाहीर केल्यानंतर एक महिन्याच्या आत संसदेच्या दोन्हीही सभागृहाची मान्यता घेणे गरजेचे असते. अन्यथा आणिबाणी संपुष्टात येते.
- संसदेच्या दोन्हीही सभागृहांनी आणिबाणीस मान्यता दिल्यास सहा महिन्यापर्यंत तिचा अंमल असतो. त्यांनतर संसदेच्या ठराव्याने एका वेळेस सहा महिन्याकरिता वाढविता येते. असा तो कितीही वेळेस वाढवता येतो.
- संसदेच्या दोन्ही सभागृहांनी आणिबाणीच्या घोषणेचा किंवा आणिबाणी पुढे ढकलण्यांचा ठराव दोन्ही सभागृहांने विशेष बहूमताने संमत करणे गरजेचे असते.
- राष्ट्रपती राष्ट्रीय आणिबाणीच्या समाप्तीची घोषणा केव्हाही करू शकतो. घोषणा समाप्तीसाठी संसदेच्या संमतीची आवश्यकता नसते.
- आतापर्यंत घोषीत झालेल्या तीन राष्ट्रीय आणिबाणी -
  1. 26 ऑक्टोबर 1962 - भारत-चीन युद्ध
  2. 03 डिसेंबर 1971 - भारत-पाकिस्तान युद्ध
  3. 25 जून 1975 - अंतर्गत अशांतता (1978 च्या 44 व्या घटना दुरूस्ती द्वारे अंतर्गत अशांतता या शब्दाच्या ऐवजी सशस्त्र उठाव हा शब्दप्रयोग समाविष्ट केला आहे.)

**घटनात्मक आणिबाणी / राष्ट्रपती राजवट - कलम 356**

- राज्यशासनाचे कार्य घटनात्मक तरतूदीनुसार चालवणि अशक्य झाल्याची खात्री झाल्यास राष्ट्रपती राज्यशासन आपल्या हातात घेते.
- एखाद्या राज्यात घटनेप्रमाणे कारभार चालवणे अशक्य आहे असे राष्ट्रपतीची राज्याच्या राज्यपालांकडून आलेल्या अहवालाच्या आधारे खात्री झाल्यास राष्ट्रपती ही आणिबाणी जाहिर करतात.
- कलम 365 - केंद्राने एखाद्या राज्याला दिलेल्या सुचना किंवा निर्देशांचे पालन किंवा अंमलबजावणी करण्यास त्या राज्याने कसूर किंवा दिरंगाई केल्यास केंद्र सरकार तेथे राष्ट्रपती राजवट लागू करतात.
- राष्ट्रपती राजवटीच्या घोषणनेपासून दोन महिन्याच्या आत संसदेच्या दोन्ही सभागृहाने त्यास संमती देणे गरजेचे असते अन्यथा आणिबाणी संपुष्टात येते.
- संसदेच्या दोन्ही सभागृहाने ठरावास मान्यता दिल्यानंतर 6 महिन्यापर्यंत अंमलबजावणी सुरू राहते. त्यानंतर दुसऱ्या ठरावाद्वारे त्यास सहा महिन्याकरिता कार्यकाळ वाढवून द्यावा लागतो. असा तो जास्तीत जास्त तीन वर्षापर्यंत वाढविता येतो.
- राष्ट्रपती राजवटीचा ठराव किंवा ती पुढे ढकण्याचा ठराव संसदेच्या दोन्ही सभागृहात साध्या बहुमताने संमत होणे गरजेचे असते.
- राष्ट्रपती घटनात्मक आणिबाणीच्या समाप्तीची केव्हाही घोषणा करू शकतात. (संसदेच्या मान्यतेची गरज नसते)
- भारतात राष्ट्रपती राजवटीचा पहिला प्रयोग - 1951 मध्ये प्रथम पंजाब राज्यासाठी करण्यात आला. सध्या 2023 मध्ये 131 वी घटनात्मक आणिबाणी जम्मू काश्मीर मध्ये सुरू आहे.
- भारतात सर्वाधिक वेळा (10 वेळा) मणिपूर या राज्यात लागू झाली.

- भारतात नऊ वेळा - उत्तर प्रदेश, जम्मू काश्मीर या राज्यात लागू झ ााली.

**महाराष्ट्र आणि घटनात्मक आणिबाणी -**

- आत्तापर्यंत तीन वेळेस लावण्यात आली.
  1. 17 फेब्रुवारी 1980 ते 9 जून 1980
  2. 28 सप्टेंबर 2014 ते 31 ऑक्टोबर 2014
  3. 11 नोव्हेंबर 2019 ते 22 नोव्हेंबर 2019
- भारतात आत्तापर्यंत छत्तीसगड व तेलंगणा या राज्यात राष्ट्रपती राजवट लागू झालेली नाही.

**आर्थिक आणिबाणी - कलम 360**

- भारताच्या एखाद्याभागाचे आर्थिक स्थैर्य / पत धोक्यात आल्याची परिस्थिती उद्‌भवल्यास व राष्ट्रपतीला खात्री झाल्यास ते आर्थिक आणिबाणीची घोषणा करू शकतात.
- आर्थिक आणिबाणीच्या घोषणेपासून दोन महिन्याच्या आत संसदेच्या दोन्ही सभागृहांनी साध्या बहुमताने मान्यता द्यावी लागते. अन्यथा आणिबाणीचा अंमल संपुष्टात येतो.
- आर्थिक आणिबाणीस तिचा कार्यकाळ वाढविण्याकरिता संसदेच्या संमतीची आवश्यकता नसते तसेच आर्थिक आणिबाणीचा जास्तीत जास्त कालावधी सांगितलेला नाही.
- आर्थिक आणिबाणीची समाप्ती राष्ट्रपती केव्हाही जाहीर करतात.(संसदेच्या मान्यतेची गरज नसते)